**अभियोगपक्षातर्फे साक्षीदार क्रमांक ०२ यांचा पुरावा**

मी याद्वारे शपथपूर्वक निवेदन करते की,

माझे नांव — शोभा प्रभाकर ठोकळे,

वय – ५० वर्षे, व्यवसाय– शेती,

सध्या राहणार – मोहरी, ता. जामखेड, जि. अहमदनगर.

**सरतपासणी विशेष सहायक सरकारी अभियोक्ता श्री. ई. ए. पठाण यांचेमार्फतः–**

फिर्यादी शरत प्रभाकर ठोकळे हा माझा मुलगा आहे. मी प्रस्तुत प्रकरणातील आरोपी क्रमांक ०१ व ०२ यांना ओळखते कारण आरोपी क्रमांक ०१ हा माझा दिर असून आरोपी क्रमांक ०२ हा माझा पुतण्या आहे. घटणा दिनांक २५/०९/२०२४ रोजी सकाळी ०८:०० ते ०८:३० वा. सुमारास मोहरी येथील शेता मध्ये नविन बांधकामाच्या ठिकाणी घडली. घटणेच्या दिवशी मी व माझा मुलगा शरद मोटार सायकलवरुन श्रीगोंदा येथे जात होतो. त्यावेळी मला आमच्या घराची चौकट पडल्या सारखे दिसले म्हणून मी शरद यास गाडी थांबविण्यास सांगीतले. त्यानंतर मी व शरद आमच्या नविन बांधकामाच्या ठिकाणी गेलो असता तेथे पुर्ण घराचे बांधकाम पाडल्याचे निदर्शनास आले. त्यानंतर आम्ही पोलीस अधिकारी झंजाड यांना फोन केला. त्यानंतर सदर पोलीस अधिकारी यांनी आम्हाला घटणास्थळ पोलीस पाठविल्याबाबत बाबत सांगीतले. त्यानंतर घटणास्थळाचा पोलीसांनी पंचनाम केला. त्यानंतर घडलेल्या प्रकाराची तक्रार पोलीस ठाणे येथे दिली.

०२ सदरची घटणा घडण्यापुर्वी माझा दिर सुनिल हा आमच्या समोर आडवा आला व म्हणाला की, "मी मोजणी झाल्याशिवाय तुला घर बांधु देणार नाही." त्यावेळी मी सुनिल यास म्हणाले की, "तु मोजणीच्या पुर्वी दोन घरे बांधली, आम्हालाच का घर बांधु देत नाहीस." घटनेसंदर्भात पोलीसांनी माझा जबाब माझ्या सांगण्या प्रमाणे नोंदविला होता. मी आरोपींना पाहिल्यास ओळखु शकते आज रोजी आरोपी क्र. २ दादा सुनिल ठोकळे हा हजर असून आरोपी क्र. १ सुनिल ठोकळे हा गैरहजर आहे.

**सरतपास पूर्ण.**

**उलटतपास आरोपींचे सुविदय वकील श्री. पी. जे. थोरात यांचेमार्फतः–**

०३. माझे शिक्षण झाले नाही. मला माझ्या मुलांनी सही करण्याचे शिकवलेले असल्यामुळे मला सही करता येते. हे म्हणने खरे आहे की, शरद व भिमा हे माझे दोन मुले आहेत. हे म्हणने खरे आहे की, साक्षीदार आनंद विक्रम ठोकळे हा माझा भावकितील पुतण्या आहे. हे म्हणने खरे आहे की, साक्षीदार शरद शहाजी सोनवणे हा माझा नातेवाईक आहे. हे म्हणने खरे नाही की, साक्षीदार उमेश प्रकाश कांबळे हा माझ्या मुलांचा मित्र आहे.

०४. हे म्हणने खरे आहे की, माझे दोन्ही मुले पुणे येथे वाहन चालकाचे काम करतात. हे म्हणने खरे आहे की, मी बांगडयाचा व्यवसाय व टेलरींगचे काम करीत होते. हे म्हणने खरे नाही की, आरोपी हे माझ्या दुरच्या भावकीतील आहेत. हे म्हणने खरे आहे की, माझी मुले पुणे येथे असल्यामुळे ते सणा निमीत्त किंवा मी बोलविल्यानंतर गावी येतात.

०५. हे म्हणने खरे आहे की, आरोपी क्र. २ दादा हा खर्डा येथील विटभट्टीवर काम करतो. हे म्हणने खरे नाही की, मी बरेच वर्ष पुणे येथे वास्तव्यास होते. हे म्हणने खरे नाही की, मी खर्डा येथील वंचित बहूजन आघाडी ची कार्यकर्ता आहे. हे म्हणने खरे नाही की, मी राजकीय काम करत असल्यामुळे सरकारी कार्यालयांमधील अधिका–यांशी माझी ओळख आहे. हे म्हणने खरे नाही की, सरकारी कार्यालयामधुन मी घरकूल योजना तसेच इतर योजनांची माहिती घेण्यासाठी कार्यालयांत जाते.

०६. हे म्हणने खरे आहे की, शासकीय योजनेचा लाभ ज्या व्यक्तीस घ्यावयाचा असतो त्या व्यक्तीने संबंधीत कार्यालयाकडे अर्ज सादर करावा लागतो. हे म्हणने खरे आहे की, सदर व्यक्तीने संबंधीत लाभाच्या अनुषंगाने त्याने संबंधीत कार्यालयाकडे आवश्यक ती कागदपत्रे सादर करावी लागतात.

०७. हे म्हणने खरे आहे की, माझ्या दोन्ही मुलांना दरमहा १८ ते २० हजार पगार मिळतो. हे म्हणने खरे नाही की, आमच्या कुटूंबाचे वार्षीक उत्तन्न एकूण रुपये ३ लाख आहे.

०८. हे म्हणने खरे नाही की, आरोपी क्र. १ सुनिल यास गुडघेदुखीचा त्रास असल्यामुळे तो मागील दोन ते तिन वर्षांपुर्वी पासून काठीच्या सहायाने चालतो. माझे

शेती व्यतिरीक्त इतर उत्पन्नांचे कोणतेही साधन नाही. हे म्हणने खरे आहे की, मी जामखेड न्यायालयामध्ये अर्जुन बारगजे याचे विरुध्द धनादेश अनादरीत झाल्याबाबत प्रकरण दाखल केले आहे. सदर प्रकरणाचा क्रमांक हा एस. सी. सी. २३५/२०२२ असा आहे किंवा कसे हे मला सांगता येणार नाही.

०९. हे म्हणने खरे नाही की, मी पुणे येथून गावी कायम स्वरुपी वास्तव्यास आल्यानंतर गावातील ब–याच लोकांसोबत माझे जमीनी संदर्भात वाद असल्यामुळे मी त्यांचे विरुध्द तहसिल कार्यालय व इतर ठिकाणी त्यांचे विरुध्द तक्रारी अर्ज दिले होते. हे म्हणने खरे आहे की, प्रस्तुतचे प्रकरण दाखल करण्यापुर्वी मी नवनाथ सिताराम हळनोर याने माझे शेतातील बांधकामाबाबत विरोध दर्शविल्यामुळे मी त्याचे विरुध्द खर्डा पोलीस ठाणे येथे तक्रार दिली होती. हे म्हणने खरे नाही की, सदरच्या तक्रारीची संबंधीतांनी दखल न घेतल्यामुळे मी तहसिल कार्यालय, जामखेड येथे उपोषणासाठी बसले होते. हे म्हणने खरे आहे की, सदरच्या उपोषणामुळे माझी पोलीस अधिकारी झंजाड यांच्या सोबत ओळख झाली. हे म्हणने खरे नाही की, त्यावेळी पोलीस अधिकारी झंजाड यांनी जर मला भविष्यामध्ये काही अडचन आली तर त्यांना संपर्क साधण्यास सांगीतले.

१०. हे म्हणने खरे आहे की, आरोपी क्र. १ सुनिल याचे सोबत घराचे कारणावरुन माझा वाद झाला म्हणून त्याने माझे विरुध्द खर्डा पोलीस ठाणे येथे अदखलपात्र गुन्हा नोंद केला होता.

११. हे म्हणने खरे आहे की, माझे सासरे हयात असतांना आमच्या जमीनीच्या वाटण्या झाल्या आहेत. हे म्हणने खरे आहे की, आरोपी क्र. १ सुनिल यांची स्वतंत्र वाटणी आहे. हे म्हणने खरे आहे की, पाच ते सहा लोकांसोबत माझे सामाईक क्षेत्र आहे. हे म्हणने खरे नाही की, माझे ज्या व्यक्तींसोबत सामाईक क्षेत्र आहे त्यांच्या सोबत माझे वाटणीच्या अनुषंगाने वाद आहेत. हे म्हणने खरे नाही की, माझे सामाईकामधील क्षेत्र असल्यामुळे नेमके माझे क्षेत्र कोणते आहे हे मला माहित नाही. हे म्हणने खरे नाही की, आमचे सामाईक क्षेत्राबाबत वाद होत असल्यामुळे सुनिल याने सदरचा वाद आपआपसात मिटवून घेण्याचा आम्हाला सल्ला दिला होता.

१२. हे म्हणने खरे आहे की, आमच्या नविन घराचे बांधकाम निश्चीत कोणत्या

तारखेला चालू केले हे मला सांगता येणार नाही. हे म्हणने खरे आहे की, घटणेच्या दिवशी आम्ही ज्या मोटारसायकलीवर श्रीगोंदा येथे जात होतो त्याचा वाहन क्रमांक मला सांगता येणार नाही. हे म्हणने खरे आहे की, माझ्या सरतपासातील मजकूर "त्यानंतर आम्ही पोलीस अधिकारी झंजाड यांना फोन केला, त्यानंतर सदर पोलीस अधिकारी यांनी आम्हाला घटणास्थळ पोलीस पाठविल्याबाबत बाबत सांगीतले. त्यानंतर घटणास्थळाचा पोलीसांनी पंचनाम केला." ही बाब माझ्या जबाबामध्ये नमूद नाही. सदरची बाब माझ्या जबाबामध्ये का नमूद नाही याचे कारण मला सांगता येणार नाही. हे म्हणने खरे आहे की, माझ्या सरतपासातील मजकूर "सदरची घटणा घडण्यापुर्वी माझा दिर सुनिल हा आमच्या समोर आडवा आला व म्हणाला की, "मी मोजणी झाल्याशिवाय तुला घर बांधु देणार नाही." त्यावेळी मी सुनिल यास म्हणाले की, "तु मोजणीच्या पुर्वी दोन घरे बांधली, आम्हालाच का घर बांधु देत नाहीस."" ही बाब माझ्या जबाबामध्ये नमूद नाही. सदरची बाब माझ्या जबाबामध्ये का नमूद नाही याचे कारण मला सांगता येणार नाही.

१३. हे म्हणने खरे नाही की, सुनिल याने माझ्या विरुध्द केलेल्या तक्रारीला शह देण्याकरीता मी व माझ्या मुलाने मिळून सुनिल व त्याचे मुलाचे विरुध्द खोटी तक्रार दाखल केली आहे. हे म्हणने खरे नाही की, मी आज रोजी खोटी साक्ष देत आहे.

**फेरतपास नाही.**

श्रवणोत्तर स्वीकृती,
समक्ष,

सही/-

**(अनुश्री ब. फंड)**
प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी,
(न्यायालय क्रमांक ०२),
जामखेड.

दिनांक:- १२/०५/२०२६
ठिकाण:- जामखेड

(साक्षीदाराचा जबाब त्याने सांगितल्याप्रमाणे नोंदविला)